(A High Impact Factor, Quarterly, Peer Reviewed, Referred & Indexed Journal)

Navjyot / Vol. IX / Issue – III ISSN 2277-8063

# कोविड–१९: भारताची आर्थिक व सामाजिक परिस्थिती

**प्रा. डॉ. विजय जालिंदर देठे,** सहा.प्राध्यापक, राज्यशास्त्र विभाग,
श्री शहाजी छत्रपती महाविद्यालय, कोल्हापूर

..............................................................................................

**प्रस्तावना:**

जागतिकीकरणानंतर जग सर्व क्षेत्रात एकमेकांच्या फारच जवळ आले होते. प्रत्येक राष्ट्र एकमेकांवर अनेक बाबतीत अवलंबून राहू लागले होते. म्हणजेच बऱ्याच प्रमाणात जग परावलंबी बनले होते. भारतासारखा देश याला अपवाद नव्हता. जगाने एवढी प्रगती केली की, पुढे काय हा प्रश्न निर्माण झाला होता. कारण जग पृथ्वीवरुन चंद्रावर गेला, मंगळावर गेला, पुढे काय? अशी परिस्थिती उद्‌भवली असतानाच कोविड–१९ नावाच्या महामारीने जग गेले ६ महिने एक संकटकालीन परिस्थितीचा मुकाबला करीत आहे. चीनच्या हुआन शहरातून निर्माण झालेला कोरोना नावाचा विषाणू बघता–बघता संपूर्ण जगभर पसरला. अमेरिका, फ्रान्स, रशिया, इंग्लड, इटली सारख्या प्रगत देशांना या विषाणू पुढे हात टेकले. सध्या भारतात तर या विषाणूमुळे सर्व मानवी जीवनच नष्ट होतय कि काय? अशी परिस्थिती निर्माण झाली. प्रस्तुत शोध निबंधामध्ये कोरोना महामारीमुळे भारताच्या आर्थिक व सामाजिक परिस्थिती संदर्भात मांडणी करण्याचा प्रयत्न केला आहे.

**उद्दिष्टे:**

१. कोविड–१९ मुळे भारताच्या आर्थिक घटकावर काय परिणाम झाला याचा अभ्यास करणे.
२. कोविड–१९ मुळे भारताच्या सामाजिक घटकांवर काय परिणाम झाला यांचा अभ्यास करणे.
३. कोविड–१९ चा प्रभाव रोखण्यासाठी भारतात कोणकोणत्या उपाययोजना आखल्या यांचा अभ्यास करणे.

**भारतीय अर्थव्यवस्था:**

कोविड–१९ चा प्रभाव व प्रसार रोखण्यासाठी प्रत्येक राष्ट्र, त्या राष्ट्रातील घटक राज्य, जिल्हा पातळीवर विविध उपाययोजना आखल्या जात आहेत. त्यामुळे आंतरराष्ट्रीय सीमा, घटक राज्य सीमा, व जिल्हयाच्या सीमा बंद केल्या गेल्या. भारतासह जगावर कोविड–१९ चा नकारात्मक प्रभाव मोठया प्रमाणात झाला. दिवसेंदिवस सर्व जगाची अर्थव्यवस्था कोलमडण्यास सुरुवात झाली. देशांतर्गत जनता कर्फ्यु, लॉकडाऊन (टाळेबंद) सामाजिक अंतर इ. उपाययोजना अवलंबल्या जात आहेत. याचा परिपाक म्हणून प्रत्येक राष्ट्राचा अंतर्गत व बाहय अर्थव्यवस्था कोलमडून पडत आहे. कोविड–१९ चा अर्थव्यवस्थेवर किती परिणाम झाला व होईल यांचा अंदाज आताच लावणे शक्य नसले तरी पण अभ्यास करणे आवश्यक आहे.

कोविड–१९ चा प्रसार रोखण्यासाठी भारतात टाळेबंदीची उपाययोजना करण्यात आली. टाळेबंदीचा निर्णय हा एकतर्फी मोदींनी घोषित केला असे म्हटले तर वावगे ठरणार नाही. असे अभ्यासांती म्हणावे लागेल. जगभरात कोविड–१९ चा प्रसार थांबवण्यासाठी टाळेबंदीचा निर्णय घेण्यात आला. तशाच प्रकारचा निर्णय भारतात ही घेण्यात आला. भारतामध्ये संसदीय शासन पध्दती आहे. या पध्दतीमध्ये संपूर्ण देशासाठी असणारा टाळेबंदीचा निर्णय संसद सदस्य मंत्रिमंडळ प्रत्येक घटक राज्य, सामाजिक संस्था, विविध विचारवंत, उद्योगपती यांना विचारात घेऊन निर्णय घेणे अपेक्षित होते. परंतु तशा प्रकारची कोणतीही बाब मोदी साहेबांच्याकडून घडली नाही. उलट टाळेबंदीचा निर्णय सर्वांवर लादला म्हटले तर वावगे होणार नाही. टाळेबंदीमुळे लोकांना घरातून बाहेर पडता येत नाही. बस, रेल्वे, विमान सेवा बंद करण्यात आली. त्यामुळे कामगारांना व नागरिकांना अनेक समस्यांना तोंड द्यावे लागले. वर्क फ्रॉर्म होम मुळे शासकीय व निमशासकीय कामगार घरात बसून काम करु लागले. परंतु खाजगी कंपन्या व उद्योगधंद्यामध्ये जे कामगार आहेत त्यांचे काय? हा प्रश्न कोणीच विचारात घेतला नाही. भारतात असंघटीत क्षेत्रामधील ५० कोटी भारतीय लोक ९० टक्के काम करतात यांचा विचार कोठेच झाला नाही. टाळेबंदीमुळे सर्व प्रकारची उत्पादन बंद झाली. घरगुती लघुउद्योग बंद झाले. अन्नधान्याचा पुरवठा कमी झाला. त्यामुळे आरोग्याच्या अनेक समस्या निर्माण झाल्या. अगोदर दारिद्रय बेकारी भारतात मोठया प्रमाणात असताना टाळेबंदीमुळे त्यामध्ये अधिकच भर पडली. असंघटीत क्षेत्रामधील ५० कोटी लोकांना रेशन दुकानातून माल देऊन कोविडचा प्रसार रोखण्यासाठी अनियोजित टाळेबंदीचा प्रयोग केला. टाळेबंदीमुळे कंपन्या व उद्योगधंदे बंद पडले. परिणामी कंपनी व उद्योग बंद

असल्यामुळे कामगारांना पगार मिळत नाही. उत्पादन बंद झाल्यामुळे खाजगी उद्योगाला मोठया प्रमाणात आर्थिक फटका बसत आहे. टाळेबंदीमुळे उत्पादन बंद झाले. कंपन्या व उद्योगधंदे बंद पडले. याचा परिणाम म्हणजे या क्षेत्रावर उपजीविका भागवणारा ५० कोटी कामगार वर्गावर उपासमारीची परिस्थिती निर्माण झाली. कंपन्या व उद्योग बंद असल्यामुळे कामगारांना पगार देणे अशक्य झाले आहे. तसेच कामगारांना पगार द्यायचा कि बँकांचे हप्ते भरायचे हा मोठा प्रश्न उद्योगधंद्यापुढे पडला आहे. या प्रकारे कंपन्या उद्योगधंदे व असंघटित कामगार यांना आर्थिक परिस्थितीला सामोरे जावे लागत आहे. भारतीय उद्योगांना सध्याच्या कोविड संकटाचा विचार करता अंदाजे ४ हजार कोटीच्या नुकसानीचा फटका बसलेला आहे, असा तज्ञाचा अंदाज आहे.

**भारतीय समाज व्यवस्था:**

कोविड–१९ चा प्रभाव भारतासह जगभरातील अनेक देशांच्या आर्थिक, सामाजिक, राजकीय, सांस्कृतिक क्षेत्रावर पडलेला आहे. भारतीय समाज व्यवस्थेवर कोविड–१९ चा प्रभाव कशा प्रकारे पडला व समाज व्यवस्था कोणत्या आव्हानांना सामोरे जात आहे यांचा ऊहापोह या घटकामध्ये पाहणार आहोत. भारतीय समाज व्यवस्थेवर कोविड–१९ चा नकरात्मक व सकारात्मक प्रभाव मोठया प्रमाणात पडलेला दिसतो. तो पुढील विविध मुद्दयाच्या आधारे

**अ) सामाजिक दुरी (Social Distance)**

जागतिकीकरणाच्या प्रक्रियेमुळे एकमेकांच्या अधिकच जवळ आलेला मनुष्य प्राणी कोविड–१९ च्या मुळे फारच दूर व एकटा राहण्यास प्रवृत्त झाला. परिणामी “मानव हा समाजशिल प्राणी आहे” असे म्हणणारे आपण एकमेकांपासून खूपच दूर दूर होत आहे. एक व्यक्ती दुसऱ्या व्यक्तीपासून दूर असणे म्हणजे सामाजिक दूरी होय. बस, रिक्षा, रेल्वे, विमान इ. दळणवळणाच्या सोयी सुविधांवर बंदी असल्यामुळे लोकांचा दैनंदिन कामकाजामुळे अनेक अडचणी निर्माण झाल्या. व्यक्ती–व्यक्तीपासून, एक जिल्हा–इतर जिल्हयापासून, एक घटक राज्य दुसऱ्या घटक राज्यापासून आणि एक देश दुसऱ्या देशापासून दूर होत चालली. हा फारच मोठा नकारात्मक बदल कोविड–१९ मुळे झालेला पहावयास व अनुभवायास मिळत आहे.

**ब) कुटुंब व्यवस्थेवरील परिणाम:**

कोविड–१९ प्रसार रोखण्यासाठी भारतामध्ये टाळेबदी हा उपाय मोठया प्रमाणात अवलंबला जात आहे. या टाळेबंदीमुळे कुटूंबातील लोक (नोकरी व कामासाठी बाहेर गावी गेलेले लोक) एकत्र राहण्यास सुरुवात झाली. परिणामी कुटुंबातील व्यक्ती एकमेकांना वेळ देऊ लागल्या. एकमेकांबद्दल प्रेम, जिव्हाळा व आपुलकी वाढली. परंतु एखादया कुटुंबातील व्यक्तीला कोविड–१९ ची लागण झाली असता त्या बाधित व्यक्तीला फारच हित दर्जा दिला जात आहे. व्यक्ती व्यक्तीकडे संशयाने पाहत आहे. बाधित व्यक्तीला दवाखान्यात चांगली वागणूक मिळते. परंतु कुटुंबात आल्यानंतर त्याचे नातेवाईक व समाज फारच खालच्या दर्जाने वागतात. कोविड–१९ मुळे मृत्यू झाला तर कुटुंबातील व्यक्ती अग्नी सुध्दा देण्यास नकार देत आहेत. अशा प्रकारच्या गंभीर बाबी समाजात घडत आहेत. “आपण रोगाशी लढायचे आहे, रोग्यांशी नाही” हे लोक समजून घेण्यास तयार नाहीत.

**क) शैक्षणिक व धार्मिक स्थळे बंद व पर्यटन बंदी:**

कोरोना महामारीमुळे शाळा, कॉलेज व महाविद्यालय, धार्मिक स्थळे इ. बंद करण्यात आली. लग्नसमारंभास मर्यादा, भाजी मार्केट या सामाजिक ठिकाणी मज्जाव, पर्याटनास बंदी, सिनेमागृह बंद, मॉल बंद यामुळे लोकांच्या आवश्यक गरजा व विचारांची देवाणघेवाण बंद झाली. मुलांचे खेळ बंद झाले. यामुळे अनेकांना आरोग्याच्या समस्या निर्माण झाल्या. शैक्षणिक व महाविद्यालय बंद ठेवण्याचा शासनाचा निर्णय योग्य होता. परंतु ऑनलाईन शिक्षण पध्दतीमुळे शिक्षण व्यवस्थेचे प्रचंड मोठया प्रमाणात नुकसान झाले आहे. प्रत्यक्ष समोरासमोर शिक्षक व विद्यार्थी हे शिक्षण, विद्यार्थी सुसंस्कृत व आज्ञार्थी बनत होता. ऑनलाईनमुळे एकतर्फी शिक्षण व्यवस्था निर्माण झाली. शाळा व महाविद्यालयामध्ये मोबाईल वापरास बंदी होती. आज मोबाईलच शाळा व महाविद्यालय चालवत आहेत. हे इथपर्यंतच थांबलेले नाही तर ज्या कुवत व आर्थिक परिस्थिती नाही अशा पालकांना १० ते १५ हजारांचा मोबाईल आपल्या मुलाला विकत घेऊन द्यावा लागत आहे. थोडक्यात मोबाईलमुळे मुले बिघडतात असे म्हणणारा समाज आज तीन वर्षाच्या मुलांपासून २५ वर्षाच्या मुलांपर्यंत सक्तीने मोबाईल हातात देताना दिसतोय.

**ड) स्वच्छतेला महत्व:**

कोरोनाचा प्रसार रोखण्यासाठी सर्वात जमेची बाजू म्हणजे स्वच्छतेला सर्वात जास्त महत्व प्राप्त झाले. केंद्र व राज्य सरकारने स्वच्छतेच्या काही योजना आखल्या होत्या. त्यापेक्षा कितीतरी पटीने लोकांना स्वच्छतेचे महत्व या कोरोनामुळे समजले. लोकांना स्वच्छतेने आपला स्वत:चा व घरांची स्वच्छता केली यांचा परिणाम म्हणजे आरोग्याच्या इतर तक्रारी फारच कमी झाल्या. शासन पैसा खर्च करुन स्वच्छतेच्या योजना राबवत होते. ते बंद होऊन लोक स्वत: स्वच्छता मोठया प्रमाणात करत आहेत.

**सारांश:**

कोविड–१९ या महामारीमुळे भारतासारख्या विकसनशिल देशाला फार मोठया आर्थिक व सामाजिक संकटांना सामोरे जावे लागत आहे. गेल्या दोन–तीन वर्षात भारताचा आर्थिक विकासाचा दर मंदावत चालला असतानाच या महामारीने भयानक घाला घातला. उद्योगधंदे व्यवसाय, लघुउद्योग बंद पडले. सार्वजनिक व खाजगी उद्योग बंद पडले. याचा परिणम भारताच्या आर्थिक घटकांवर फार मोठया प्रमाणात झाला. लाखो लोकांच्या नोकऱ्या गेल्या. दारिद्रय व बेकारीचे प्रमाण वाढले. तरुणांना नोकरीसाठी अगोदरच संघर्ष करावा लागत होता. परंतु या महामारीमुळे बेकारीचा प्रश्न निर्माण झाला. देशांची आर्थिक परिस्थिती अगोदरच डबघाईला आली असताना आता भयानक बिकट प्रसंग भारताच्या आर्थिक क्षेत्रात निर्माण झालेला दिसतो. आर्थिक परिस्थिती बिघडली असतानाच या महामारीमुळे भारताची सामाजिक परिस्थितीची ही बिकट स्थिती निर्माण झाली. समाजामध्ये सामाजिक दुरी मोठया प्रमाणात निर्माण झाली आहे. कुंटुंब व्यवस्थेवर वाईट परिणाम झालेले आहेत. त्याची आर्थिक व सामाजिक कोंडी मोठया प्रमाणात झाली. शाळा, कॉलेज, धार्मिक स्थळे, पर्यटन इ. बंद असल्यामुळे समाजाचा समतोल ढासळलेला आहे. या महामारीमुळे कुंटुंबे उद्वस्थ झालेली आहेत. अन्न व आर्थिक घटकांबाबतीत अनेक लोकांचे प्रश्न निर्माण झाले आहेत. घरातील कर्ती माणसांचा मृत्यू झाल्यामुळे हजारो कुंटुंब रस्त्यावर आली आहेत. जरी सरकार उपाययोजना करत असले तरी पाहिजे तेवढे यश प्रशासकीय यंत्रणेला व सरकारला येताना दिसत नाही.

**संदर्भ:**

१. दै. लोकसत्ता संपादकीय लेख– गिरीश कुबेर.
२. डॉ. सुहास पळशीकर– You Tube – मुलाखत.
३. डॉ. शैलेंद्र देवळाणकर – You Tube – मुलाखत.
४. डॉ. प्रकाश पवार– राष्ट्रीय वेबीनार – व्याख्यान (१० जून २०२०)
५. डॉ. शिवाजी पाटील– राष्ट्रीय वेबीनार– व्याख्यान (१५ जुलै २०२०)